RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784

वर्ष ३ रे | अंक : १५८ वा | सोमवार दि. ०४ ऑगस्ट २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्ष शिंदे-अजित पवारांच्या महत्त्वकांक्षामुळे फुटले? देवेंद्र फडणवीस यांचं वक्तव्य चर्चेत...

**वृत्तसंस्था/ मुंबई**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच एका वृत्त वाहिनीला मुलाखत दिली आहे. या मुलाखतीत त्यांनी अनेक राजकीय घडामोडींवर भाष्य केलं. देवेंद्र फडणवीस यांच्यावर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन पक्ष फोडल्याचे आरोप होतात. याबाबत देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारण्यात आलं. त्यावेळी स्पष्टीकरण देताना देवेंद्र फडणवीस यांनी हे दोन्ही पक्ष उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राजकीय महत्त्वकांक्षाने फुटले, असं स्पष्ट वक्तव्य केलं. यावेळी त्यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचं त्यांच्या पक्षातील आमदारांसोबत असणारं नातं आणि राष्ट्रवादीत अजित पवार यांना कशी वागणूक दिली जात होती, याबाबत भाष्य केलं आहे. उद्धव ठाकरे हे कोणाच्याही लग्नाला गेले तर त्यांना वाटतं की तेच नवरदेव आहेत. त्यांना तेवढंच अटेन्शव हवं असतं. उद्धव ठाकरेंचा पक्ष सर्वात आधी कुणी फोडला? शरद पवारांनी फोडला. १९९२ मध्ये जेव्हा शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे जिवंत होते तेव्हा सर्वात आधी शरद पवारांनी पक्ष फोडला. छगन भुजबळ यांच्यासोबत १३ लोक पक्ष सोडून गेले होते. आता त्याच शरद पवारांसोबत युती करुन उद्धव ठाकरे मुख्यमंत्री बनले, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. दोन्ही पक्ष अंतर्गत महत्त्वकांक्षासाठी फुटले त्यांचा पक्ष फुटला त्यावर ते आमच्यावर ब्लेम करु शकत नाहीत. कारण एकनाथ शिंदे हे कट्टर बाळासाहेबांचे समर्थक होते. पण त्यांच्या लक्षात आलं की, आदित्य ठाकरे यांना नेता बनवण्यासाठी उद्धव ठाकरे आपले पंख छाटत आहेत हे एकनाथ शिंदे यांच्या लक्षात आलं. तसेच शिंदे ज्या खात्याचे मंत्री होते त्याची बैठकदेखील आदित्य ठाकरे घेत होते. त्यामुळे त्यांच्या लक्षात आलं की, एकीकडे आपण विचारधारा सोडली आहे आणि दुसरीकडे आपले पंख छाटले जात आहेत. त्यांना लक्षात आलं की, आता आपण उठाव केला नाही तर आपण राजकारणात संपून जावू. त्यावेळी हे सर्वजण बाहेर आले. ही त्यांची महत्त्वकांक्षी आहे, असा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केली. तेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात झालं. अनेक वर्ष अजित पवार हे शरद पवार यांचे उत्तराधिकारी आहे, असं वाटत होतं. पण गेल्या काही वर्षांमध्ये सुप्रिया सुळे यांना उत्तराधिकारी म्हणून पुढे केलं जातं. अजित पवारांना अनेक वेळा व्हिलन बनवलं गेलं. अजित पवारांना लक्षात आलं की, यापुढे राजकारण पुढे जाणार नाही. त्यांच्या लक्षात

आलं की, आपल्याला हळूहळू अशाप्रकारे व्हिलन बनवलं जात आहे की, आपण पक्षात राहू शकत नाही. त्यावेळी ते बाहेर पडले. हे दोन्ही पक्ष अंतर्गत महत्त्वकांक्षासाठी फुटले, असा मोठा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला. उद्धव ठाकरे यांचं आमदारांसोबतचं संभाषण संपलं होतं. उद्धव ठाकरे यांचे आमदार त्यांना भेटू देखील शकत नव्हते. ते अनेकदा त्यांच्या घराच्या गेटवरुन भेट न घेता परतत होते. यामध्ये अनेक जण हे बाळासाहेब ठाकरे यांच्यासोबत वर्षानुवर्षे राहिलेले होते. उद्धव ठाकरेंनी एकप्रकारे तृष्टीकरणाची नीती सुरु केली होती. काँग्रेससारखं करत होते. त्यामुळे आमदारांची घुसमट होत होती. ते विचार करत होते की, पुढच्या वेळी निवडणुकीला जनतेसमोर कसं जायचं? हीच घुसमट त्यांना आमच्यासोबत घेऊन आली. उद्धव ठाकरे वरच्या मजल्यावर राहत होते, ते जमिनीवरुन निघून गेले, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. उद्धव ठाकरे यांचे आमदार जेव्हा बाहेर पडले तेव्हा आम्हाला राजकीय संधी दिसली. ते बाहेर पडले तेव्हा आम्ही त्यांच्यासोबत संपर्क केला. जे आम्ही करु शकत होतो ते आम्ही केलं. त्यांचा पक्ष फोडण्यासाठी आम्ही काहीच केलं नाही. पक्ष फुटल्यानंतर आम्ही राजकीय संधी घेतली, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

# धक्कादायक व्यापाऱ्याकडून २ लाख ८० हजाराची बॅग लुटण्याचा प्रयत्न!

**जनसंचलन/ खामगाव**

खामगाव येथील व्यापारी दुकान बंद करून घरी जात असतांना, २ बुरखादारी गुंडांनी अग्नीशस्त्राचा धाक दाखवत व्यापाऱ्याकडून २ लाख ८० हजाराची बॅग लुटण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी दोन्ही आरोपींना खामगाव पोलिसांनी अटक केली आहे. गजानन यशवंत गाडेकर(३५) रा.बाळापुर जि. अकोला व योगेश डिंगाबर पूरी (३७) रा. शेगाव जि. बुलढाणा असे या आरोपींचे नाव आहे. अशोक गेस्ट हाऊस जवळील उद्योजक सोहन गोपालदास चौधरी यांनी या संदर्भात तक्रार दाखल केली होती. १९ जुलै रोजी ते रात्री १०.३० वाजता दुकान बंद करून आपल्या एम एच २८ बी यु ६०७० क्रमांकाच्या ॲक्टिव्हाने घरी परतत असताना, अज्ञात बुरखेधारक आरोपींनी पांढऱ्या रंगाच्या स्कुटीवर येऊन

शस्त्राचा धाक दाखवून त्यांच्याकडील पैशांची बॅग हिसकण्याचा प्रयत्न केला.या प्रकरणी खामगाव पोलीस स्टेशनला आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हा क्लिष्ट असताना, पोलिसांनी जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे,अप्पर पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा यांच्या मार्गदर्शनात या आरोपींना सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक तपासावरून जेरबंद केले आहे.आरोपींचा ४ दिवसाचा पीसीआर घेण्यात आला असून, त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली ६० हजार किमंतीची सुझुकी स्कुटी, १० हजार किमतीचा १ देशी पिस्टल व ६०० रुपये किमतीचे ३ काडतूस तसेच ३० हजार रुपये किंमतीचे २ मोबाईल असा एकुण १,००,६०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली खामगावचे ठाणेदार आर.एन. पवार व पथकाने केली आहे.

# खेळा शिस्तीत...

## संपादकीय लेख

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) चे राष्ट्रीय क्रीडा महासंघात येणे ही आगामी राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयकाची सर्वांत मोठी उपलब्धी आहे. क्रीडा क्षेत्रात अधिक पारदर्शकता आणणे, उत्तरदायित्व लागू करणे आणि निर्णयप्रक्रियेत खेळाडूंना अधिक ठोस आवाज देणे, हे याचे उद्देश आहेत. आजपर्यंत सरकारने विविध संघटनांमधील समस्या सोडविण्यासाठी आणि संघटनांवर नियंत्रण मिळविण्यासाठी या पूर्वी तीन विधेयके आणण्याचा प्रयत्न केला होता. या विधेयकाचा पूर्वीचा मसुदा बाजूला पडला असला, तरी सन २०३६च्या ऑलिम्पिकचे भारतात आयोजन करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या मोदी सरकारने नवीन क्रीडा विधेयक मंजूर करण्यासाठी योग्य वेळ निवडली आहे. या वेळी क्रीडा मंत्रालयाने व्यापक दृष्टिकोन ठेवून प्रथम आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीची भेट घेतली आणि त्यांना आश्वासन दिले, की ते ऑलिम्पिकची भावना आणि ङ्गचार्टरफ्नुसार काम करतील. त्यानंतर विखुरलेल्या भारतीय ऑलिम्पिक संघटनेमधील (आयओए) सर्व गटांना या तरतुदी लवकरात लवकर मान्य व्हाव्यात, यासाठी प्रयत्न करण्यात आले. क्रीडाक्षेत्रात देशाच्या भविष्याला आकार देण्यासाठी, सरकारने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी क्रीडा व युवक मंत्रालयासाठी ३७९४ कोटी रुपयांची विक्रमी तरतूद केली आहे. गेल्या वर्षीच्या सुधारित अर्थसंकल्पातील ३,२३२ कोटी रुपयांपेक्षा ही मोठी वाढ आहे. सर्व राष्ट्रीय क्रीडा महासंघांना सरकारकडून आर्थिक मदत मिळत आहे. मंत्रालयाने हे पैसे खेळाडूंपर्यंत पोहोचतील याची खात्री केली असून कागदोपत्रीच अस्तित्व असलेल्या अनेक महासंघांवर निश्चितच काही नियंत्रण आवश्यक आहे. अनेक राष्ट्रीय महासंघांच्या पदांवर राजकीय नेते आणि नोकरशहांचे वर्चस्व आहे. आज न्यायालये आणि केंद्रीय न्यायाधिकरणांमध्ये सुमारे ७७० क्रीडा-संबंधित प्रकरणे प्रलंबित आहेत. सन २०१५पासून प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये विविध क्रीडा संस्थांमधील प्रशासन, निवडणुका आणि खेळाडूनिवडीसंदर्भातील वाद आहेत. यातील काही महत्त्वाची प्रकरणे उच्च न्यायालये (४६२) आणि सर्वोच्च न्यायालयात (२२) आहेत. त्यात अनेक राष्ट्रीय क्रीडा महासंघ याचिकाकर्ते किंवा प्रतिवादी म्हणून सहभागी आहेत. २००हून अधिक प्रकरणांमध्ये राष्ट्रीय क्रीडा महासंघ एक तर खटला दाखल करणारा पक्ष आहे; किंवा त्यांच्यावर खटला दाखल होत आहे. दिल्ली उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिलेल्या ङ्ग२६/८फ निकाल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आदेशांची मालिका ङ्गबेंचमार्कफ झाली आणि राष्ट्रीय क्रीडा महासंघाच्या अनेक निवडणुका रद्द करण्यात आल्या. क्रीडा आणि युवक मंत्रालयाने २६/८ आदेशांना सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले, त्याच्या निर्णयाची प्रतीक्षा आहे. राष्ट्रीय क्रीडा न्यायाधिकरणाची स्थापना ही बाब कायमची संपवण्याचे आश्वासन देते; कारण त्याकडे दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील. यामध्ये एक अध्यक्ष आणि इतर दोन सदस्य असतील. न्यायाधिकरणाचे प्रमुख सर्वोच्च न्यायालयाचे विद्यमान किंवा निवृत्त न्यायाधीश अथवा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश असतील. यावरील नियुक्त्या केंद्र सरकारच्या हाती असतील; त्यात सरन्यायाधीश किंवा सरन्यायाधीशांनी शिफारस केलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील समिती किंवा विधी आणि न्याय मंत्रालयातील सचिव आणि क्रीडा सचिवांचा समावेश असेल. आर्थिक अनियमितता आणि सार्वजनिक हिताच्या विरुद्ध असलेल्या कृतींसह, नियमांचे उल्लंघन झाल्यास केंद्र सरकारला सदस्यांना काढून टाकण्याचा अधिकार असेल. या न्यायाधिकरणाच्या आदेशांना केवळ सर्वोच्च न्यायालयात आव्हान देता येईल; त्यामुळे खेळांशी संबंधित वादांचे निराकरण करण्यात कोणतीही कनिष्ठ न्यायालये सहभागी होणार नाही. त्याचा परिणाम वादांच्या जलद निपटाऱ्यात होईल. न्यायाधिकरणाच्या निर्णयानंतर ३० दिवसांत अपील दाखल करावे लागेल; परंतु अंतिम मुदत संपल्यानंतर ते दाखल करता येईल, का हे ठरविण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला असेल. राजकीय नेते, नोकरशहा आणि व्यक्तींकडून महासंघ कायमस्वरूपी ताब्यात घेण्याच्या विरोधात, या विधेयकात विशेष तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार क्रीडा संस्थांमध्ये अध्यक्ष, सरचिटणीस आणि कोषाध्यक्ष या पदांसाठी सलग तीन टर्मची कार्यकाळ मर्यादा १२ वर्षांपर्यंत निश्चित केली आहे. आंतरराष्ट्रीय सनद आणि संबंधित खेळाच्या कायद्यांनुसार नामांकनाच्या वेळी वयोमर्यादा ७० वर्षे ठेवण्यात आली आहे, ती ७५ वर्षांपर्यंत वाढवता येऊ शकेल. सोयीसाठी आणि राजकीय हेतूंसाठी पूर्वी स्थापन केलेल्या मोठ्या कार्यकारी समित्यांमधून, महासंघावर आर्थिक भार जास्त नसावा, याची खात्री करण्यासाठी क्रीडा संस्थेच्या संख्येवर १५ची मर्यादा घालण्यात आली आहे. कार्यकारी समितीमध्ये किमान दोन उत्कृष्ट गुणवत्तेचे खेळाडू आणि चार महिला पदांवर असणे अनिवार्य असेल. क्रीडा प्रशासनात लिंगसमानता सुनिश्चित करण्यासाठी आणि खेळाडूंना निर्णयप्रक्रियेत सहभागी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय प्रयत्नांशी सुसंगत अशी ही तरतूद आहे. विधेयकातील सर्वांत चर्चेचा आणि काहीसा वादग्रस्त भाग म्हणजे राष्ट्रीय क्रीडा मंडळाची (एनएसबी) तरतूद. या मंडळास सर्व राष्ट्रीय क्रीडा महासंघांना मान्यता देण्याचे, निलंबित करण्याचे आणि खेळाडूंच्या कल्याणासाठी आंतरराष्ट्रीय महासंघांशी सहयोग करण्याचे प्रमुख अधिकार असतील. त्याचे सदस्य केंद्र सरकार क्षमता, सचोटी आणि दर्जा असलेल्या व्यक्तींमधून नियुक्त करेल. त्यावरील नियुक्ती निवड समितीच्या शिफारशींवर आधारित असतील, तिचे अध्यक्ष कॅबिनेट सचिव किंवा क्रीडासचिव असतील. या पॅनेलचे इतर सदस्य भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे महासंचालक, राष्ट्रीय क्रीडा संस्थेचे अध्यक्ष किंवा महासचिव किंवा कोषाध्यक्ष म्हणून काम केलेले दोन क्रीडा प्रशासक आणि द्रोणाचार्य, खेलरत्न किंवा अर्जुन पुरस्कार विजेते एक खेळाडू असतील. कार्यकारी समितीसाठी निवडणुका घेण्यात अपयशी ठरलेल्या किंवा निवडणूक प्रक्रियेत गंभीर अनियमितता करणाऱ्या राष्ट्रीय संस्थेची मान्यता रद्द करण्याचा अधिकार मंडळाला देण्यात आला आहे.

# शिक्षकेतर कर्मचारी संघटनेची सर्वसाधारण सभा संपन्न

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलडाणा जिल्हा माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा शिक्षकेतर कर्मचारी संघटनेची कार्यकारिणी सभा आज दिनांक ३ ऑगष्ट रोजी दुपारी विश्राम भवन बुलढाणा येथे संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र घुबे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संघटनेचे उपाध्यक्ष शैलेंद्र महाजन यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर कार्यकारणी सभेसाठी जिल्हा सचिव शिवाजी बाहेकर, कार्याध्यक्ष सतीश कुलकर्णी, अंतर्गत कोषाध्यक्ष मो.रीजवान, जिल्हा प्रशीद्धी प्रमुख मोहमद असलम अंजुम, अशोक वानखेडे,संतोष वरखेडे,पवन चौधरी,रेखा ठाकरे विश्वास टाले, साबीर अली सहीत आदीची उपस्थित होते.

जिल्हा माध्यमिक शाळा शिक्षकेतर कर्मचारी संघटनेची सर्वसाधारण सभा यशस्वीपणे पार पडली. या सभेत विविध विषयांवर चर्चा झाली आणि सदस्यांनी आपापल्या समस्या व सूचना मांडल्या. सभेत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध समस्यांवर चर्चा झाली. यामध्ये प्रामुख्याने वेतनश्रेणी, पदोन्नती, सेवाशर्ती, आणि इतर शासकीय योजनांचा लाभ मिळणे यांसारख्या मुद्द्यांवर चर्चा झाली. संघटनेची भूमिका यापुढेही कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कांसाठी लढा देण्याचा निर्धार व्यक्त केला. सभेत मोठ्या संख्येने सदस्य उपस्थित होते, ज्यांनी सक्रियपणे चर्चेत भाग घेतला. पुढील कार्यवाही सभेत झालेल्या चर्चेच्या आधारावर पुढील कार्यवाही करण्याचे ठरले. यात शासनाकडे विविध मागण्या मांडणे, तसेच आवश्यक असल्यास कायदेशीर लढाई लढणे यांचा समावेश आहे. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे काम करून शाळेच्या विकासासाठी प्रयत्नशील राहण्याचा निर्धार व्यक्त केला. सभेच्या यशस्वीतेमुळे संघटनेच्या सदस्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# नवउद्योजकांसाठी सुवर्णसंधीची मैत्री!

**जनसंचलन/बुलढाणा**

मैत्री दिवस असला तरी,जिल्हा उद्योग केंद्राकडून मैत्री कक्षा अंतर्गत मोफत शासकीय मार्गदर्शन सेवा उपलब्ध झाली आहे.त्यामुळे उद्योजकांनी मार्गदर्शन घेऊन योजनांचा लाभ प्राप्त करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. नवउद्योजक, लघु व मध्यम उद्योग तसेच निर्यात क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यावसायिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा, तसेच उद्योग स्थापनेसाठी आवश्यक मार्गदर्शन सहज उपलब्ध व्हावे या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाने मैत्री या विशेष कक्षाची स्थापना केली आहे. मैत्री कक्षामार्फत एक मोफत कॉल सेंटर सेवा कार्यरत असून, या सुविधेद्वारे नवोदित आणि सध्या कार्यरत असलेल्या उद्योजकांना मार्गदर्शन मिळू शकते.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मनसेसोबत युतीच्या चर्चा; उद्धव ठाकरेंचा तीन दिवसांचा दिल्ली दौरा, कोणाच्या भेटीगाठी?

**नवी दिल्ली :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे तीन दिवसांच्या दिल्ली दौऱ्यावर जाणार आहेत. एकीकडे ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चा असताना उद्धव ठाकरे इंडिया आघाडीची वज्रमूठ घट्ट करण्यासाठी दिल्लीवारी करणार आहेत. त्यामुळे ठाकरे गट आणि मनसे एकत्र येणार की युती फिस्कटणार, अशा चर्चा राजकीय वर्तुळात रंगल्या आहेत. त्याही पलिकडे एक पाऊल जात राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेनाच इंडिया आघाडीत सामील होणार का, असाही प्रश्न विचारला जात आहे.आगामी स्थानिक

स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांचा दिल्ली दौरा अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. दौऱ्यात ते इंडिया आघाडीच्या बैठकीला उपस्थित राहतील. राहुल गांधींसह इतर नेत्यांच्या भेटीगाठी घेतील.ग्राम पंचायत, पंचायत समिती, नगरपालिका आणि महापालिका निवडणुका येत्या वर्षअखेरपर्यंत पूर्ण होणं अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर, दिल्लीत इंडिया आघाडीची एक महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. उद्धव ठाकरे या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी सहा ते आठ ऑगस्ट या कालावधीत दिल्लीत असतील. या काळात ते इंडिया आघाडीच्या अनेक प्रमुख नेत्यांना भेटतील.सात ऑगस्ट रोजी इंडिया आघाडीच्या नेत्यांची दिल्लीत बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीपूर्वी उद्धव ठाकरे आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यात फोनवरून चर्चा झाली होती. या संभाषणात आगामी बैठकीची रणनीती आणि संभाव्य विषयांवर चर्चा झाल्याचे सांगण्यात येते. इंडिया आघाडीची एकता अबाधित राखण्याच्या दृष्टीने ही बैठक आणि चर्चा खूप महत्त्वाची मानली जाते. याआधीच आम आदमी पक्षाने इंडिया आघाडीतून काढता पाय घेतला आहे. उद्धव ठाकरे यांचा दिल्ली दौरा केवळ राजकीय बैठकांपुरता मर्यादित राहणार नाही, तर ते दिल्लीतील इतर काही महत्त्वाच्या व्यक्तींनाही भेटू शकतात. महाराष्ट्रातील अलिकडच्या राजकीय उलथापालथीनंतर त्यांच्या या दौऱ्याकडे विशेष लक्ष वेधले गेले आहे.

## पती शारीरसंबंध ठेवण्यास सक्षम नाही, पुण्यात विवाहितेचा आरोप, कोर्ट म्हणालं दोन महिन्यात सासरी जाऊन...

**पुणे :** पती शारीरिक संबंध ठेवण्यास सक्षम नसल्याचा आरोप करून त्याला सोडून गेलेल्या पत्नीचा दावा पुणे कौटुंबिक न्यायालयाने सबळ पुराव्यांअभावी फेटाळला. पत्नीने दोन महिन्यांच्या आत पतीच्या घरी परत जाऊन वैवाहिक संबंध स्थापित करावेत, असा आदेश न्यायाधीश गणेश घुले यांनी दिला. ङ्ककेवळ आरोप करणे आणि ते कायद्याच्या आधारे सिद्ध करणे या दोन बाबी भिन्न आहेत,फ असे न्यायालयाने निकालात स्पष्ट केले आहे.या प्रकरणातील पती-पत्नीचा विवाह २०२१ मध्ये झाला. मात्र, त्यानंतर पत्नी पतीचे घर सोडून निघून गेली. त्यामुळे पतीने हिंदू विवाह कायद्यांतर्गत वैवाहिक नातेसंबंध पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी कौटुंबिक न्यायालयात याचिका दाखल केली. पतीच्या वतीने ॲड. मयूर साळुंके, ॲड. अजिंक्य साळुंके, ॲड. अमोल खोब्रागडे, ॲड. पल्लवी साळुंके यांनी बाजू मांडली.पत्नीने कोणताही सबळ कारणाशिवाय आपला त्याग केला असून, तिला परत नांदायला येण्याचा आदेश द्यावा, अशी मागणी केली.

त्यावर, पती हा संशयी स्वभावाचा असून, तो शारीरिक संबंध ठेवण्यास असमर्थ आहे. लग्नानंतर एकदाही शारीरिक संबंध प्रस्थापित झाले नाहीत, असे गंभीर आरोप पत्नीने केले.हा विवाह रद्द करण्यासाठी दुसऱ्या न्यायालयात स्वतंत्र याचिका दाखल केल्याचेही पत्नीने लेखी जबाबात नमूद केले. पतीने हे सर्व आरोप पुराव्यांच्या आधारे फेटाळून आपण शारीरिकदृष्ट्या पूर्णपणे सक्षम असल्याचे ठामपणे सांगितले. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतले. पत्नीने पतीच्या शारीरिक क्षमतेवर आरोप केला असला, तरीही कोणताही वैद्यकीय पुरावा दिला नाही; तसेच पत्नीच्या म्हणण्यात विसंगती असून, त्यातून तिच्या दाव्यावर संशय निर्माण होतो, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. एकमेकांशी पटत नसल्यामुळे जवळपास सव्वातीन वर्षांपासून वेगळं राहणाऱ्या उच्चशिक्षित दाम्पत्याने परस्पर संमतीने घटस्फोट मिळवण्यासाठी केलेल्या अर्जावर पुणे कौटुंबिक न्यायालयाने अवघ्या पंधरा दिवसांत शिक्कामोर्तब केलं होतं. पती आणि पत्नी १८ महिन्यांपेक्षा अधिक काळ विभक्त राहत असल्याने सहा महिन्यांचा फेरविचार कालावधी या प्रकरणात वगळण्यात आला होता. या दाम्पत्याला मूलबाळ नव्हतं. पतीने पत्नीला तिचं स्त्रीधन आणि पाच लाख रुपये परत केले होते. त्यानंतर कोर्टाने घटस्फोट अर्ज मंजूर केला होता.

## मुख्यमंत्री फडणवीसांची मोठी घोषणा; आता मत्स्य व्यावसायिकांनाही मिळणार शेतकऱ्यांप्रमाणे कर्ज....

**अमरावती:** मत्स्य व्यवसायाला शेतीचा दर्जा देण्यात आल्याने शेतकऱ्यांना रोजगाराचा नवा पर्याय उपलब्ध झाला आहे. आता मत्स्य व्यावसायिकांनाही किसान क्रेडिट कार्डसह शेतकऱ्यांना मिळणारी कर्जे उपलब्ध होतील, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी मोर्शी येथे केली.अमरावती जिल्ह्यातील मोर्शी येथील मत्स्य विज्ञान महाविद्यालयाच्या भूमिपूजन प्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महसूलमंत्री तथा अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मत्स्य व्यवसायमंत्री नितेश राणे , खासदार डॉ. अनिल बोंडे आदी उपस्थित होते. ङ्कमहायुतीचे सरकार शेतकऱ्यांना निश्चितपणे कर्जमाफीचा लाभ देणार आहे. शेतकऱ्यांना यापुढे दिवसा १२ तास वीज मिळणार आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना यासाठी अमलात आणली जात आहे. ही योजना डिसेंबर २०२६पर्यंत पूर्ण होईलफ, असे फडणवीस यांनी सांगितले.राज्य शासनाच्या अनेक महत्त्वाकांक्षी योजना आहेत. यापुढे एक हजार लोकवस्ती असणाऱ्या गावांना शहरापर्यंत जोडण्यासाठी

सिमेंट काँक्रीटचे रस्ते तयार केले जाणार आहेत. यासाठी वीस हजार कोटी रुपये खर्च करण्यात येतील. प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून आत्तापर्यंत १३ लाख घरे बांधण्यात आली. सुमारे दोन लाख लाभार्थ्यांना भूखंड व त्यावर घरही बांधून देण्यात येत आहे. या माध्यमातून महाराष्ट्र बेघरमुक्त करण्यात येणार आहेफ, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.देवेंद्र फडणवीस हे २०१९मध्ये मुख्यमंत्रिपदी विराजमान होणार होते. पण, चपट्या पायाचे लोक राजकारणात असल्याने दगाबाजी झाली. आम्हाला जनादेश मिळाला होता, पण त्या लोकांनी हिंदुत्वाशी बेईमानी केली. मत्स्य विज्ञान महाविद्यालयाचे भूमिपूजनही तेव्हाच होते. आता उशिरा का होईना भूमिपूजन होत आहे, ही आनंदाची बाब आहे. आता दोन वर्षातच या महाविद्यालयाचे उद्घाटन फडणवीस यांच्याहस्ते होणार आहे, असा विश्वास मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी व्यक्त केला.

# पोटच्या मुलांसाठी झटणाऱ्या माऊलीने राणी मुखर्जीला मिळवून दिला पहिला राष्ट्रीय पुरस्कार; भारावून गेली अभिनेत्री...

**मुंबई:** अभिनेत्री च्या करिअरमधील सर्वात महत्त्वाची घटना १ ऑगस्ट २०२५ रोजी घडली आणि ती म्हणजेराणीने राष्ट्रीय पुरस्कारावर नाव कोरले आहे. ३० वर्षांच्या करिअरमध्ये पहिल्यांदाच तिला हा पुरस्कार मिळणार आहे. अशिमा चिब्बर दिग्दर्शित मिसेस चॅटर्जी व्हर्सेस नॉर्वे या अतिशय भावनिक प्रवास असणाऱ्या कोर्टरूम ड्रामाने प्रेक्षकांचे मन जिंकले होते. हा सिनेमा समीक्षकांच्याही पसंतीस उतरलेला. या चित्रपटात राणी मुखर्जीने साकारलेल्या देबिका चॅटर्जी या पात्राचे विशेष कौतुक झाले. पोटच्या मुलांचा ताबा मिळवण्यासाठी नॉर्वेमध्ये झटणाऱ्या आईची कहाणी या सिनेमात दाखवली आहे. परदेशी कायदेशीर प्रणाली आणि जवळच्या व्यक्तींशी संघर्ष करणाऱ्या एका आईची भूमिका राणीने अत्यंत प्रभावीपणे साकारली. याच भूमिकेसाठी तिला राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्यानंतर अभिनेत्रीने एक निवेदन जारी करत आनंद व्यक्त केला. तिने असे म्हटले की, मिसेस चॅटर्जी व्हर्सेस नॉर्वेमधील माझ्या अभिनयासाठी राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याने मी खूप भारावून गेले आहे. माझ्या ३० वर्षांच्या कारकिर्दीतील हा पहिलाच राष्ट्रीय पुरस्कार आहे. एक अभिनेत्री म्हणून, मी भाग्यवान आहे की माझ्याकडे काही अविश्वसनीय चित्रपट आहेत आणि त्यांच्यासाठी मला खूप प्रेम मिळाले. राष्ट्रीय पुरस्कार ज्युरींचे मी मिसेस चॅटर्जी व्हर्सेस नॉर्वेमधील माझ्या कामाचा सन्मान केल्याबद्दल आभार मानते.पुढे तिने असे नमूद केले की, हा क्षण मी चित्रपटाच्या संपूर्ण टीमसोबत, माझे निर्माते निखिल अडवाणी, मोनिशा आणि मधू, दिग्दर्शिका आशिमा चिब्बर आणि या खास प्रोजेक्टवर काम केलेल्या प्रत्येकासोबत शेअर करते, ज्यांनी मातृत्वाच्या जिद्दीचा हा उत्सव साजरा केला. माझ्यासाठी हा पुरस्कार माझ्या ३० वर्षांच्या कामाचे, माझ्या कलेप्रती असलेल्या समर्पणाचे, सिनेमा आणि या सुंदर इंडस्ट्रीप्रती असलेल्या आवडीचे प्रणाणीकरण आहे.राणीने असेही म्हटले की, मी माझा राष्ट्रीय पुरस्कार या जगातील सर्व अतुलनीय माऊलींना समर्पित करते. आईच्या प्रेमासारखे काहीही नाही आणि आपल्या मुलांचे रक्षण करण्याची तिची क्षमता खूप मोठी आहे. तिने असेही म्हटले की, एक आई आपल्या मुलांसाठी डोंगर हलवू शकते आणि जग चांगलं घडवू शकते. या चित्रपटाने हे दाखवण्याचा प्रयत्न केला. अभिनेत्रीने तिची ३० वर्ष साथ देणाऱ्या चाहत्यांचेही या निवेदनातून आभार मानले.

# राज-उद्धव यांची युती जाऊद्या, दोन्ही शिवसेना एकत्र येणार? देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणात काहीही घडू शकतं. याआधीच्या राजकीय घडामोडींनी तर हेच दाखवून दिलं आहे. आगामी काळात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे एकत्र येतील का? असा प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आला. त्यावर त्यांनी प्रतिक्रिया दिली. विशेष म्हणजे यावेळी त्यांना मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार का? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावरही त्यांनी मनमोकळेपणाने प्रतिक्रिया दिली. तसेच दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले तरी महायुतीच मुंबई महापालिका निवडणूक जिंकेल, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. आमचे अनेक मीडियाचे लोक ठाकरे बंधू एकत्र आले तर असं दाखवताय जसं काही आम्हीच त्यांना वेगळं केलं होतं. पण आमचा काही रोल नव्हता. आपापसात भांडण होतं. उद्धव ठाकरेंनी राज ठाकरेंना शिवसेनेतून बाहेर काढलं होतं. आता दोन्ही एकत्र आले तर ते मला त्याचं श्रेय देत आहेत. तर मी ते श्रेय घेऊ इच्छित आहे. मी त्यासाठी खूप आनंदी आहेङ्खङ्ख, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली.यावेळी देवेंद्र फडणवीस यांना उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे एकत्र येतील का? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी राजकीय युती करणं खूप सोपं असतं. पण मनं तुटलेली असतात तेव्हा युती करणं कठीण असतं. इथे मनं तुटली आहेतङ्खङ्ख, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

# स्कुटीचं पुढचं चाक निघालं इतका मोठा अपघात, खेडमध्ये उत्कृष्ट बॅडमिंटनपटू असलेल्या विद्यार्थ्याचा मृत्यू....!

**रत्नागिरी :** कोकणात मुंबई-गोवा महामार्गावर खेड जवळ पुलाजवळ भीषण अपघात झाला आहे. या अपघात एका दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला आहे. भरधाव वेगात असलेली दुचाकी न आवरल्याने भरणे पुलावर आदळून हा अपघात झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. यातच या मुलाचा मृत्यू झाला आहे. स्वरूप संदीप सागवेकर असं या अल्पवयीन युवकाचे नाव आहे. तो १७ वर्षांचा होता. तर दुसरा एक युवक गंभीरित्या जखमी झाला आहे. त्याला डेरवण येथील वालावलकर रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. यथार्थ सकपाळ (वय १६ ) असे जखमी झालेल्या युवकाचे नाव आहे.स्वरूप सागवेकर हा खेड येथील समर्थ कृपा इंग्लिश मीडियम स्कूलचा विद्यार्थी होता. यावर्षी तो दहावी पास होऊन इयत्ता अकरावी त्याने इंग्लिश मीडियमला प्रवेश घेतला होता. स्वरूप हा उत्कृष्ट बॅडमिंटनपटू होता. तो व्यायामासाठी जात असताना दुर्दैवीरीत्या हा अपघात झाला आहे. स्वरूप याच्या मृत्यूने सागवेकर कुटुंबीयांवरती मोठा दुःखाचा डोंगर कोसळला आहे.स्वरूप याच्या पश्चात एक लहान भाऊ, आई-वडील, आजी असं कुटुंब आहे. त्याच्या वडिलांचे खेड शहरातील श्री पाथरजाई मंदिराजवळ दुकान आहे. हे कुटुंब खेड तालुक्यातील सुकीवली येथील आहे. स्वरूपचा अपघाती मृत्यू झाल्याने परिसरात आणि तालुक्यातून हळहळ व्यक्त केली जात आहे. स्वरूप याला दहावीलाही चांगले मार्क पडले होते. तो अभ्यासातही हुशार होता. त्याच्या जाण्याने खेड शहर परिसर आणि तालुक्यातून हळहळ व्यक्त केली जात आहे. समर्थ कृपा इंग्लिश मीडियमच्या शिक्षक आणि व्यवस्थापनाकडूनही शोक व्यक्त करण्यात आला आहे. अपघाताचे वृत्त कळताच स्वरुपच्या घराकडे शिक्षकांनी, त्याच्या मित्रमंडळींनी अनेकांनी धाव घेतली.हा अपघात इतका भीषण होता की, गाडीचे पुढील चाक तुटून रस्त्यावर दूर जाऊन पडले. त्यामुळे गाडीवरील दोघेही जोरात फेकले गेले. यामध्ये स्वरूप सागवेकर या युवकाचा जागीच मृत्यू झाला.

तर दुसरा युवक यथार्थ सकपाळ हा गंभीर जखमी आहे. त्याच्यावर डेरवण येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघातानंतर महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन वाहतूक सुरळीत केली. या अपघाताची नोंद करण्यात आली आहे.

# कॅन्सरमुळे आईचं निधन, काही महिन्यातच बाबांचा अकाली मृत्यू; मराठी अभिनेत्यानं सांगितला कठीण काळ...

**मुंबई -** मराठी अभिनेता हर्षद अतकरीने कोणीही गॉडफादर नसताना मराठी इंडस्ट्रीमध्ये स्वतःचं स्थान निर्माण केलं. हर्षदने फुलाला सुगंध मातीचा, दुर्वा, कुण्या राजाची तु गं राणी, सारे तुझ्याचसाठी, अंजली यांसारख्या मालिकांमध्ये काम केलं आहे. पण एक वेळ अशी होती की, हर्षदवर लागोपाठ दुःखाचा डोंगर कोसळलेला. त्याबद्दल हर्षदनं एका मुलाखतीमध्ये भाष्य केलं आहे. फुलाला सुगंध मातीचा या मालिकेदरम्यान अभिनेत्याच्या आईचं निधन झालं. त्याबद्दल, राजश्री मराठीच्या त्याची गोष्टमध्ये हर्षद म्हणाला की मी या जवळपास वर्षभर कुठे या विषयाची वाच्यता नाही केली. पर्सनल लाईफ इज पर्सनल लाईफ. मी या गोष्टी प्रोफेशनमध्ये कुठेही आणत नाही. मग असं होतं की, करू शकत नाही. लास्ट सप्टेंबर जेव्हा फुलाला सुगंध मातीचा मालिका सुरू होती, तेव्हा आई गेली. तिला कॅन्सर होता. हे पण खूप कमी लोकांना माहिती आहे. दोन वर्षांपासून ती या आजारपणाचा सामना करत होती. ह्या मे महिन्यामध्ये बाबा गेले अचानक. त्यांचं तर फार अचानक घडलं आणि हे सरप्रायजिंग होतं.पण मला बहीण आहे. त्यामुळे मला तिला बघायचंय. माझं असं आहे की, आता म्हणून फायदा नाहीये. जे व्हायचं होतं ते नाहीच व्हायला पाहिजे होतं पहिली गोष्ट, म्हणजे खूपच लवकर झालंय. दोन्ही गोष्टी खूपच लवकर झाल्या. मी ह्याची कल्पनासुद्धा नव्हती केली. मला आठवतं जेव्हा आई होती, तेव्हा मी या सिनेमाचं शूटिंग केलं, तेव्हा तिची तब्येत बरी होती. ते केमो आणि सगळ्या ट्रिटमेंटमधून. जेव्हा जेव्हा तिला बरं होतं, तेव्हा मी या सिनेमाचं शूट केलंय. त्या झोनमध्ये मी सिनेमापण शूट केलाय. तेव्हा मी नेहमी तिला सांगायचो की, बघ माझी फिल्म येणार आहे. त्यामुळे ती असती तर बरं झालं असतं, ते मिस झालं आणि हा रिग्रेट माझ्या मनात कायम असणार, त्याबद्दल खुप बेकार वाटतंय पण मी काहीच करू शकत नाही. असं हर्षद पुढे म्हणाला.

# ऑर्केस्ट्राच्या नावाखाली डान्सबार! ताडदेव, अंधेरी, घाटकोपरमध्ये छापा; मुंबई गुन्हे शाखेची धडक कारवाई

**मुंबई:** मुंबईतील सावली बारवरून राजकारण तापले असतानाच उपनगरांतील अनेक बारमध्ये ऑर्केस्ट्राच्या नावाखाली अश्लील नृत्य सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.गेल्या दोन दिवसांत मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकांनी ताडदेव, अंधेरी आणि घाटकोपरमधील नामांकित बारवर छापा टाकून अनेकांची धरपकड केली. या तीनही बारमधून २५ बारबालांची सुटका करण्यात आली असून त्यांच्यावर पैसे उडवत अश्लील नृत्यासाठी प्रोत्साहन देणाऱ्या जवळपास ६० जणांवर कारवाई करण्यात आली. बारचालक आणि मालक यांच्यावर याबाबत संबंधित पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल

करण्यात आले आहेत.परवानगीपेक्षा अधिक बारबाला ठेवल्या जातात. त्यांना लपवण्यासाठी बारमध्ये अनेक छुप्या जागा तयार केल्या जातात. असे असले तरी बाहेरून सर्व आलबेल आणि नियमानुसारच सुरू असल्याचे चित्र निर्माण केले जाते. ताडदेव येथे नुकत्याच सुरू झालेल्या पुष्पा बारमध्ये असाच प्रकार सुरू असल्याची माहिती गुन्हे शाखा युनिट तीनच्या पथकाला मिळाली. पथकाने शुक्रवारी मध्यरात्री या बारवर छापा टाकला. बारमध्ये झाडाझडती घेतली असता १२ बारबाला नृत्य करताना सापडल्या. ३२ ग्राहक त्यांच्या नृत्यावर खुश होऊन पैशाची उधळण करताना आढळले. ग्राहक, कामगार, बारचालक अशा सुमारे ४७ जणांविरुद्ध ताडदेव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.अंधेरी येथील साची बार अँड रेस्टॉरंटमध्ये नियम डावलून गाणी गाण्याच्या बहाण्याने बारबालांना अश्लील नृत्य करण्यास लावले जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. गुन्हे शाखा युनिट १० च्या पथकाने शहनिशा करण्यासाठी या बारवर छापा टाकला असता सात महिला नृत्य करताना आढळून आल्या. जवळपास वीस ग्राहकांना त्यांना नृत्य करण्यास प्रोत्साहित करताना पकडण्यात आले. ग्राहक, बार कर्मचारी अशा सुमारे २६ जणांविरुद्ध अंधेरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घाटकोपर येथील त्रिमूर्ती बारमधून तीन ते चार बारबालांची गुन्हे शाखा युनिट सात च्या पथकाने सुटका केली. ऑर्केस्ट्राच्या नावाखाली सर्व नियम पायदळी तुडवून डान्सबार चालविणाऱ्या चालक आणि मालकासह याप्रकरणी १६ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि महाराष्ट्र हॉटेल, उपहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रूम) यामधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम २०१६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## भारताच्या विजयाच्या मार्गात इंग्लंडच्या एकाच खेळाडूचा अडसर, कोण आहे तो जाणून घ्या..

**ओव्हल :** भारतीय संघाने जो रूट आणि हॅरी ब्रुक्ससारख्या नामांकित खेळाडूंना बाद केले आहे. त्यामुळे भारताला पाचवा कसोटी सामना जिंकण्यासाठी सर्वाधिक संधी असल्याचे म्हटले जात आहे. पण यावेळी भारताच्या विजयाच्या मार्गात इंग्लंडचा एका खेळाडूचा अडसर आहे. हा खेळाडू जर मैदानात आला तर भारताचा पराभव होऊ शकतो, असे आता म्हटले जात आहे.भारताने इंग्लंडची ६ बाद ३३९ अशी अवस्था केली आहे. इंग्लंडचे सर्व महत्वाचे फलंदाज बाद झाले आहेत. त्यामुळे आता इंग्लंडच्या तळाच्या फलंदाजांना लवकर बाद केले तर भारताला विजय मिळवता येऊ शकतो. कारण आता इंग्लंडचे गोलंदाज फलंदाजीसी मैदानात उतरणार आहेत. इंग्लंडला विजयासाठी ३५ धावांची गरज आहे, तर भारताला चार विकेट्स, असे म्हटले जात आहे. पण इंग्लंडचा कोणता खेळाडू भारतासाठी धोकादायक ठरू शकतो, हे आता समोर आले आहे.भारताने सामन्यात दमदार कमबॅक केले. जो रूट आणि हॅरी ब्रुक्स यांना माघारी धाडले. आता सर्व इंग्लंडचे गोलंदाजच

आहेत, असे बऱ्याच जणांना वाटत असेल. पण ही गोष्ट दिसते तेवढी खरी नाही. कारण इंग्लंडचा एक खास अष्टपैलू खेळाडू आता मैदानात उतरू शकतो. असे दिसत आहे. पहिल्या डावात तो फलंदाजीला आला नव्हता. पण आता आपल्या संघाला विजय मिळवून देण्यासाठी तो मैदानात येऊ शकतो. हा इंग्लंडचा खेळाडू आहे ख्रिस वोक्स. पहिल्या डावात ख्रिस वोक्सला फिल्डिंग करताना दुखापत झाली होती. त्याचा खांदा दुखावला होता. त्यामुळे तो पहिल्या डावात फलंदाजीला आला नव्हता. पण आता तो दुसऱ्या डावात फलंदाजीला येणार असल्याचे दिसत आहे. कारण चौथ्या दिवशी तो फलंदाजीची तयारी करत असल्याचे पाहायला मिळाले. ख्रिस वोक्स हा उत्तम अष्टपैलू खेळाडू आहे. त्यामुळे तो मैदानात आला तर अन्य तळाच्या फलंदाजांना चांगले मार्गदर्शन करू शकतो आणि इंग्लंडला विजयापर्यंत पोहोचू शकतो. त्यामुळे ख्रिस वोक्स हा इंग्लंडसाठी सर्वात महत्वाचा ठरणार आहे, पण भारतासाठी तो धोकादायक ठरू शकतो.भारताला हा सामना जिंकण्यासाठी आता चार नाही तर पाच विकेट्स मिळवाव्या लागणार आहेत. कारण ख्रिस वोक्स मैदानात येणार नाही, असे सर्वांनीच मानले होते. पण ख्रिस वोक्सने फलंदाजीला यायची तयारी दर्शवली आहे. त्यामुळे पाचव्या दिवशी तो फलंदाजीला येईल, असे चित्र दिसत आहे.

## कुणालाही भाषेच्या आधारावर मारलं तर कारवाई करणारच, देवेंद्र फडणवीस यांचा इशारा...

**मुंबई :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा इशारा दिला आहे. ते एका मुलाखतीत बोलत होते. हे चुकीचं आहे. कुणालाही भाषेच्या आधारावर मारणं योग्य नाही. महाराष्ट्रात

तुम्ही राहतात म्हणून तुम्हाला मराठी आली पाहिजे हा आग्रह ठिक आहे. पण हा दुराग्रह होता कामा नये. तुम्ही कुणी मराठी बोलत नाही यासाठी कुणाला मारु शकत नाही, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. यावेळी त्यांनी मंत्री नितेश राणे यांचं वक्तव्यदेखील चुकीचं असल्याचं म्हटलं.नितेश राणे जे बोलले ते चुकीचं आहे. त्यांना खरंतर वेगळं बोलायचं होतं. त्यांचं म्हणणं होतं की, तुम्ही मराठी येत नाही म्हणून हिंदूंना मारत आहेत. इतर लोकं देखील आहेत ज्यांना मराठी बोलत नाहीत त्यांना का मारत नाहीत? नितेश राणे जे बोलले ते एकप्रकारे बरोबर आहे आणि दुसरीकडे चुकीचं देखील आहे. केवळ भाषेच्या आधारावर किंवा कोणत्या धर्माची लोकं ही भाषा बोलत नाहीत या आधारावर हे डिस्क्रिमिनेट होऊ शकत नाही. हे चुकीचं आहे. त्यामुळे अशा भाषेचा वापर व्हायला नको, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.मराठी बोलता येत नाही म्हणून मारहाण झाल्याच्या दोन-तीन घटना निश्चित झाल्या आहेत. जो घटना करणार त्याच्यावर आमचं सरकार कारवाई करणार. मी आधी हे सांगतो की, महाराष्ट्रात मराठी शिकण्याची सक्ती आहे. आम्ही ती सक्तीची केली आहे. त्याबाबत आमचं कोणतंही कॉम्प्रमाईज नाही.

महाराष्ट्रात मराठी बोलली गेली पाहिजे असा आग्रह करणं चुकीचं नाही. पण कुणी मराठी बोलू शकत नाही तर त्याला तुम्ही मारणार हे आमच्या सरकारला मंजूर नाही. असं जो करणार त्यावर आम्ही कारवाई करणार म्हणजे करणार, असं देवेंद्र फडणवीस स्पष्ट म्हणाले.

देवेंद्र फडणवीस यांच्या या वक्तव्यावर आता मनसे अध्यक्ष राज ठाकरे काय प्रतिक्रिया देतात? ते पाहणं महत्त्वाचं आहे. आगामी काळात मुंबई महापालिकेच्या निवडणुका आहेत. त्यामुळे राज ठाकरे आणि भाजप यांच्यातील शाब्दिक संघर्ष वाढतो का? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

# शिवसेनेचा बाप..; परिणय फुकेंचं विधान, महायुतीत वाद पेटला, शिवसेना पदाधिकाऱ्यांनी इशारा दिला

**भंडारा :** महाराष्ट्रात स्थानिक पातळीवर महायुतीत कुठे ना कुठे वादाची ठिणगी पडल्याचे पाहायला मिळत आहेत. परिणय फुके ंचा एका विधानामुळे शिवसेना नेते आक्रमक झाले आहेत. शिवसेना पक्षप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेना नेते आनंद दिघे यांच्याबद्दल प्रत्येकजण आदर ठेवतो. परंतु भाजपचे आमदार परिणय फुके यांनी पक्षाच्या कार्यकर्ता मेळाव्यात आपण शिवसेनेचा बाप असल्याचे वक्तव्य केले. या विधानामुळे शिवसेना कार्यकर्ते दुखावले गेले आहेत. फुकेंनी १२ तासांच्या आत त्यांच्या विधानाबद्दल माफी मागावी नाहीतर, आम्ही शिवसेना शैलीत त्यांना योग्य

उत्तर देऊ, असा इशारा शिवसेना शिंदे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.भंडारा येथील विश्राम भवनात रविवारी यानिमित्त पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी शिवसेना नेते संजय कुंभलकर म्हणाले, शिवसेना पक्षप्रमुख बाळासाहेब ठाकरे हेच शिवसेनेचे बाप आहेत. अशा परिस्थितीत कुणीही शिवसेनेचे अवैध बाप बनण्याचा प्रयत्न करू नये. जिल्हा बँकेच्या निवडणुकीमध्ये फुकेंनी शिवसेनेचे उमेदवार डॉ. प्रकाश मालगावे यांना पराभूत करण्यासाठी काँग्रेस उमेदवाराला सहा मते देण्याचे षडयंत्र रचले. त्यामुळे शिवसेना उमेदवाराचा पराभव झाला.

फुकेंनी शिवसेनेबद्दल अपमानास्पद भाषा वापरून शिवसैनिकांच्या भावना दुखावल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशा नेत्यांना आवरावे, अन्यथा शिवसेनेचा बाप कोण आहे हे आम्ही सांगू, असा इशाराही कुंभलकर यांनी दिला. विश्राम भवनात झालेल्या पत्रकार परिषदेला शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल गायधने, उपप्रमुख सुरेश धुर्वे, जिल्हा उपप्रमुख विजय काटेखाये, प्रकाश मालगावे, दीपक गजभिये, मनोज साकुरे, देवराज बावनकर, बंडू हटवार आदी उपस्थित होते.भंडारा जिल्हा नियोजन भवनात १ ऑगस्ट रोजी झालेल्या महसूल विभागाच्या बैठकीत आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना घरकुलधारकांना वाळू कधी दिली जाईल, अशी विचारणा केली. त्याचवेळी, फुके हे भोंडेकर यांना बळजबरीने अडवित होते.

त्यांचा मुद्दा टाळण्याचा प्रयत्न करत होते. आमदार भोंडेकर यांच्या मुद्द्यात फुके जबरदस्तीने हस्तक्षेप करत असल्याने त्यांनी बैठकीतून निघून जाणे पसंत केल्याचे त्यांनी सांगितले.

# बॉक्स ऑफिस गाजवलं, ओटीटी वरही केलं अधिराज्य; आता टिव्हीवर येणार फुलवंती! कुठे आणि कधी?

**मुंबई:** अभिनेत्री च्या फुलवंतीने २०२४ मध्ये बॉक्स ऑफिस गाजवले होते. ११ ऑक्टोबर २०२४ रोजी रीलिज झालेल्या या सिनेमाने थिएटरमध्ये ५० दिवसाहून अधिक काळ अधिराज्य केले. त्यामुळे गेल्यावर्षी बॉक्स ऑफिसवर या सिनेमाचा डंका पाहायला मिळाला. त्यानंतर २२ नोव्हेंबर २०२४ पासून हा सिनेमा प्राइम व्हिडिओ या ओटीटी प्लॅटफॉर्मवरही उपलब्ध आहे. ओटीटीवरही रीलिज झाल्यानंतर काहीच दिवसात लाखो प्रेक्षकांनी हा चित्रपट पाहिला होता. थिएटर किंवा ओटीटी प्लॅटफॉर्मवर ज्यांना हा सिनेमा पाहता आला नाही, त्यांच्यासाठी एक खूशखबर आहे. घरबसल्या अगदी मोफत फुलवंती पाहता येणार आहे. जाणून घ्या, कसं आणि कुठे?प्राजक्तासाठी हा सिनेमा तिच्या करिअरमधील एक मोठा टप्पा आहे. कारण तिने फुलवंतीच्या माध्यमातून निर्मिती क्षेत्रात पाऊल ठेवले. अलीकडेच पार पडलेल्या फिल्मफेअर मराठी पुरस्कार २०२५ या सोहळ्यात या चित्रपटाने सर्वाधिक ७ पुरस्कार जिंकले. प्राजक्तानेही या सिनेमासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्री हा फिल्मफेअर पुरस्कार पटकावला. प्राजक्ताचे चाहत्यांसाठी आणखी एक आनंदाची बातमी म्हणजे, आता हा चित्रपट टीव्हीवर पाहता येणार आहे.फुलवंतीचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमयर झी टॉकीजवर होणार आहे. या वाहिनीवर रविवार १० ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता आणि संध्याकाळी ६ वाजता हा सिनेमा प्रसारित होणार आहे. झी टॉकीजने शेअ केलेल्या पोस्टमध्ये याविषयी असे कॅप्शन देण्यात आले आहे की, आपल्या नृत्याने सर्वांना मंत्रमुग्ध करणारी फुलवंती, व्यंकटध्वरी नरसिंह

शास्त्रींच्या मनावर करु शकेल का राज्य? प्राजक्तानेही ही पोस्ट तिच्या इन्स्टाग्राम प्रोफाइलवर शेअर केली आहे. प्राजक्ताने या सिनेमाद्वारे निर्मितीमध्ये पदार्पण केले होते, तर अभिनेत्री स्नेहल तरडेने फुलवंतीमधून पहिल्यांदाच दिग्दर्शन केले आहे. ती या सिनेमात शास्त्रीबुवांच्या पत्नीच्या भूमिकेत झळकली होती. तर या व्यंकटध्वरी नरसिंह शास्त्रींच्या भूमिकेत अभिनेता गश्मीर महाजनीने मुख्य भूमिका साकारली. या कलाकारांशिवाय सिनेमात क्षितीश दाते, निखिल राऊत, वैभव मांगले, चिन्मयी सुमीत, ऋषीकेश जोशी, मंगेश देसाई, प्रसाद ओक, सविता मालपेकर, दिप्ती लेले, जयवंत वाडकर हे कलाकार झळकले आहेत.

# नेहरू-गांधींच्या विचारांचा संदर्भ देत गडकरींनी मांडला विदर्भ विकासाचा दृष्टिकोन

**नागपूर :** भाजप नेत्यांकडून अनेकदा पंडित जवाहरलाल नेहरू आणि महात्मा गांधी यांच्या धोरणांवर कठोर टीका होत असते. यात मात्र केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या दोन्ही नेत्यांच्या विकासविषयक दृष्टिकोनाचा सकारात्मक संदर्भ देत नागपूरमध्ये एक संतुलित भूमिका मांडली आहे. रविवारी नागपूरमध्ये कन्फेडेरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री () च्या विदर्भ विभागीय कार्यालयाचे उद्घाटन गडकरी यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमात बोलताना त्यांनी पंडित नेहरू आणि महात्मा गांधी यांच्या विचारांची तुलना करत विदर्भ विकासासाठी प्रेरणादायी दिशानिर्देश दिले.गडकरी म्हणाले, गांधीजी आणि नेहरूजी यांचे दोन विचार फार प्रसिद्ध आहेत. नेहरू म्हणायचे ङ्कआपल्याला जास्तीत जास्त उत्पादन हवेफ तर गांधीजी म्हणायचे ङ्कजास्तीत जास्त लोकांना सहभागी करून अधिकाधिक उत्पादन हवेफ या दोन्ही दृष्टिकोनांचा संगम म्हणजेच आजच्या काळात समावेशक आणि परिणामकारक विकास. असे गडकरी म्हणाले.राजकीय चर्चांमध्ये नेहरूंवर काश्मीर, चीन आणि समाजवादी धोरणांबाबत टीका केली जाते, तर गांधीजींवर फाळणीवेळी पाकिस्तानला मदतीसाठी आग्रह धरल्याबद्दल प्रश्न उपस्थित होतो. मात्र गडकरींचे वक्तव्य हे नेहरू-गांधी धोरणांचा आर्थिक आणि सामाजिक दृष्टीने सकारात्मक उपयोग करणारे असल्याने महत्त्वाचे ठरते. विदर्भाच्या संदर्भात बोलताना गडकरी म्हणाले की, ङ्कङ्कविदर्भात महाराष्ट्रातील ७५ टक्के खनिजसंपत्ती, ८० टक्के जंगल आणि कोळशाचे विपुल साठे आहेत. या निसर्गसंपत्तीचा योग्य वापर करून हरित उद्योग, स्टील, कृषी प्रक्रिया आणि लॉजिस्टिक्स क्षेत्राचा विस्तार करता येऊ शकतो. नागपूर हे मॉडेल सिटी म्हणून पुढे यावे. ते पुढे म्हणाले, रोजगारनिर्मिती ही आमची प्राथमिकता आहे. योग्य तंत्रज्ञानाचा वापर करून आणि विदर्भातून निर्यात वाढवून संपूर्ण क्षेत्र समृद्ध करता येईल. विदर्भ समृद्ध झाला, तर महाराष्ट्र समृद्ध होईल आणि त्यातून भारताचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचा आत्मनिर्भर भारताचा स्वप्न साकार होईल. गडकरी यांनी विदर्भाला हरित उद्योग आणि एकात्मिक लॉजिस्टिक्सचे केंद्रफ्र बनवण्याची गरज व्यक्त केली. नागपूर हे एक मॉडेल शहर बनू शकते, जिथे पायाभूत सुविधा उद्योगांना आधार देतात आणि लघुउद्योगांना उभारी मिळते, असे त्यांनी स्पष्ट केले

# भोन येथील पुरातत्त्व स्थळ परिसर प्रतिबंधित क्षेत्र म्हणून जाहीर !...

## पुरातत्त्व विभागाच्या उपसंचालकांनी केला स्पॉट पंचनामा

**जनसंचलन/ संग्रामपूर**

बुलढाणा जिल्ह्याला जागतिक पटलावर कीर्ती मिळवून देणाऱ्या संग्रामपूर तालुक्यातील भोन गावात असलेल्या भूमिगत बुद्ध स्तूप स्थळ परिसराला प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभागाच्या उपसंचालकांनी आपल्या टीम सह भोन परिसराला भेट देऊन स्थळ निरीक्षण करत ही संपूर्ण पुरातन स्मारक परिसर प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. यावेळी पुरातन विभाग नागपूर येथील उपसंचालक मयुरेश खडके, त्यांचे सहकारी, जलसंपदा विभागाचे उपकार्यकारी अभियंता रवींद्र विश्वकर्मा, भारतीय स्तूप व लेणी संवर्धन समितीचे अध्यक्ष डॉ. सिद्धार्थ मेश्राम, सचिव प्रा. प्रफुल खंडारे, कोषाध्यक्ष जी. एन. ब्राह्मणे, शेतमालक श्रीकृष्ण इंगळे, ग्रामपंचायत ग्रामसेवक श्री परिहार तथा पदाधिकारी आणि ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते. भोन येथे जमिनीत सम्राट अशोक कालीन २३०० वर्ष जुने बुद्ध स्तूप आढळून आलेले आहे. डेक्कन कॉलेज पुणे चे डॉ. भास्कर देवतारे यांना संशोधनात गवेशना दरम्यान हा स्तुप २००२ साली आढळून आला आहे.. हा संपूर्ण परिसर जिगाव जलसिंचन प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात

जात असल्याने लवकरच ९९.७५ हेक्टर परिसराला संरक्षक भिंत बांधून हा स्तूप परिसर संरक्षित केला जाणार आहेत.. महाराष्ट्र शासनाने या संपूर्ण परिसरातील पुरावास्तु राज्य संरक्षित स्मारके म्हणून घोषित केली आहे. आणि आता लवकरच या परिसराचे उत्खनन होऊन जमिनीत असलेल्या २३०० वर्ष जुन्या भारतीय संस्कृतीचा वारसा जगासमोर येणार आहे. जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता श्रीराम हजारे, पुनर्वसन विभागाचे कार्यकारी अभियंता तुषार मेतकर, उपसा सिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता परमजीतसिंग जुनेजा जिगाव प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी सकारात्मकतेने काम करत आहेत तसेच शासन देखील या प्रकल्पाला वेळोवेळी आवश्यक बळ देत आहे. त्यामुळे जिगाव जलसिंचन प्रकल्पाचा एक महत्त्वाचा भाग असलेल्या भोन येथील स्तूपाच्या संरक्षक भिंतीचे बांधकामाचे काम हाती घेऊन पूर्ण करावे जेणेकरून आज संपूर्ण परिसर संरक्षित होऊन लवकरात लवकर येथील भारतीय संस्कृतीचा पुरातन वारसा जगासमोर येईल. पर्यायाने जिल्ह्यात एक मोठे पर्यटन केंद्र उभारले जाऊन रोजगाराच्या संधी निर्माण होतील. असे आवाहन भारतीय स्तूप व लेणी संवर्धन समितीचे अध्यक्ष डॉ. सिद्धार्थ मेश्राम यांनी केले आहे. भोन येथील परिसरात जागतिक दर्जाचे म्युझियम तसेच तस्सम सुविधा निर्माण केल्या जाणार असल्याने खारपान पट्टा म्हणून अनेक दशक दुर्लक्षित असलेला हा परिसर पुन्हा एकदा सुजलाम सुफलाम होऊन आपले अस्तित्व पुनर्प्रस्थापित करणार आहे.

# सनीच्या हत्येप्रकरणी संतापाचा भडका; नागरिक धडकले ठाण्यात...

**जनसंचलन/बुलडाणा**

शहरातील चिखली रोडवरील ग्रीन लीफ हॉटेलजवळ १ ऑगस्ट रोजी १९ वर्षीय सनी जाधव याची निघृण हत्या करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत सहा आरोपींना अटक केली असली तरी, सनीला घरून बोलावून नेणारा युतकही अद्याप मोकाट असल्याने परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रकरणी त्यावर गुन्हा दाखल करून त्यासही अटक करण्यात यावी, या मागणीसाठी परिसरातील १०० पेक्षा अधिक नागरिकांनी ३ ऑगस्ट रोजी थेट बुलढाणा शहर पोलिस ठाणे गाठले होते. धामणदरी येथील रहिवासी सनी जाधव याच्यावर प्रेमप्रकरणातून देवराज माळी व त्याच्या साथीदारांनी चाकूने हल्ला करून हत्या केली होती. घटनेनंतर काही तासात पोलिसांनी चार आरोपींना ताब्यात घेतले. मात्र, या हत्येच्या आधी सनीला त्याच्या घरून बोलावून नेणाऱ्या युवकाचा सहभाग सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्टपणे दिसून येत असतानाही त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही, यामुळे संतप्त नागरिकांनी थेट शहर पोलिस ठाण्यात धडक दिली. ३ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता धामणदरी परिसरातील मोठ्या संख्येने नागरिक पोलिस ठाण्यात दाखल झाले आणि त्या युवकासही अटक करून त्याच्यावरही गुन्हा दाखल करावा, अशी जोरदार मागणी केली. यावेळी प्रतीक जाधव यांनी पोलिसांशी चर्चा करत न्यायाची मागणी केली. या पार्श्वभूमीवर पोलीस विभागाने काही लोकांचे जबाब नोंदवणे सुरू केले आहे.




# शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष हेलांडे ६ ऑगस्टला जिल्ह्यात !

**जनसंचलन/बुलढाणा**

वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलांडे (पाटील) ६ ऑगस्ट रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहे. गेल्या चार महिन्यात ते तिसऱ्यांचा जिल्ह्यात येत आहेत. बुधवारी दुपारी तीन वाजता संग्रामपूर येथील विश्रामगृहात पोहोचतील त्यानंतर तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी व बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्यासोबत तालुक्यातील शेतकरी आत्महत्या आणि चारा लागवडीबाबत ते बैठक घेणार आहेत. त्यानंतर शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील सदस्यांची ते भेट घेणार आहेत. यासोबतच चारा लागवडीसाठी प्रस्तावित स्थळाला भेट देऊन ते पाहणी करणार आहेत. त्यानंतर शेगाव येथे ही ते शेतकरी आत्महत्या व चारा लागवडीसंबंधी चर्चा करणार आहेत. चारा लागवड करून दुग्धव्यवसायातून शेतकरी समृद्ध करण्याची भूमिका घेऊन त्यांनी विदर्भात हा रकम सरू केला आहे

# भरधाव कारखाली चिरडला शेतकरी महिलेचा भाजीपाला !

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा रविवारच्या आठवडी बाजारात जयस्तंभ चौकात खेड्यापाड्यांतील शेतकरी भाजीपाला विक्रीसाठी बसले होते. अण्णा भाऊ साठेंच्या पुतळ्यालगत बाजार भरलेला असताना, अचानक दुपारी एक भरधाव कार थेट शेतकरी व विक्रेत्यांच्या दिशेने आली. जीव वाचवण्यासाठी विक्रेते आणि ग्राहक घाबरून बाजूला पळाले. बाजारासाठी आलेले नागरिकही घाबरून ओरडू लागले; मात्र या सगळ्या गोंधळातही संबंधित चालकाने कार थांबवली नाही. प्रत्यक्षदर्शींनी पाहिले असता, त्या कारमध्ये वाहतूक शाखेचा कर्मचारी बसलेला होता. या वाहनाने कोलवड येथील शेतकरी महिला शांताबाई सुभाष जाधव यांचा भाजीपाला चिरडून टाकला. एवढ्यावरच न थांबता, त्या पोलिस कर्मचाऱ्याने कोणतीही दया न दाखवता वाहन घेऊन पोबारा केला. घटना लक्षात येताच नागरिकांनी त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला, त्याच्या चुकीकडे लक्ष वेधले, तरीही तो थांबला नसल्याचा आरोप होत आहे. हा धक्कादायक प्रकार महसूल विभागाच्या अधिकारीदेखील व्यथित झाले. बाजारात उपस्थित असलेल्या शेकडो नागरिकांनी हा प्रकार पाहिला आणि त्याचे फोटो व व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. घटनेनंतर भयभीत झालेली महिला. एका अधिकाऱ्याच्या उपस्थितीत

घडला. या असंवेदनशील प्रकारामुळे संबंधित या घटनेमुळे कायद्याच्या रक्षकांकडूनच जर असा बेजबाबदारपणा केला जात असेल, तर कायदा व न्याय यांची व्याख्या काय, शेतकऱ्यांनी घाम गाळून पिकवलेली भाजी अशापद्धतीने कोणीही चिरडून टाकावी का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या प्रकरणी पोलिस अधीक्षक निलेश तांबे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, तो होऊ शकला नाही

# कावड यात्रेतील भीषण अपघात भरधाव दुचाकीने घेतला जीव, एक ठार तिघे गंभीर जखमी!

**जनसंचलन/बुलढाणा**

४ ऑगस्ट श्रावण सोमवारच्या पवित्र कावड यात्रेला अपघाताचा काळडोळा लागला! अजिंठा मार्गावरील पळसखेडजवळ आज पहाटे ३:३० वाजता भरधाव दुचाकीने कावडधाऱ्यांना चिरडल्याने एकजण जागीच ठार, तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. मृतक मुकेश गजानन राठोड (वय २५, रा. करवंड) हा शेगाव येथील संत गजानन महाराज संस्थानचा सेवाधारी असून दोन मुलांचा पिता होता. गुळभेली येथून काल संध्याकाळी पहिल्यांदाच बुधनेश्वर मंदिरासाठी कावड यात्रा निघाली होती. आरती करून यात्रेकरू परतीच्या मार्गावर असताना पळसखेड-नागोच्या दरम्यान भरधाव मोटरसायकल (२८ ५२७४) ने मुकेशसह आणखी दोन कावडधारकांना उडवले. योगेश चव्हाण आणि एक अन्य कावडधारी गंभीर जखमी झाले असून, दुचाकीस्वार ऋषिकेश काकडे आणि मनोज माळोदे हे देखील जबर जखमी आहेत. विशेष म्हणजे हे दोघेही कावडधारीच असून थकव्यामुळे दुचाकीने घरी परतत होते.

या दुर्दैवी अपघाताने संपूर्ण गुळभेली व करवंड परिसरात शोककळा पसरली आहे. अपघातग्रस्त सर्वांना तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र मुकेशचा मृत्यू उपचारापूर्वीच झाला

# कोयता घेऊन रील बनवणाऱ्या आरोपीचे पोलिसांनी उपटले कान!

**जनसंचलन/बुलढाणा**

अनेक तरुण सोशल मीडियावर भाईगिरीचे व्हीडिओ बनवून इन्स्टाग्राम, फेसबुक सह इतर समाज माध्यमावर व्हायरल करून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. बुलढाणा येथील आरोपी अमित बेंडवाल आणि आदित्य ऊर्फ शक्ती संजय देशमुख दोघे रा.बुलडाणा यांनी हातामध्ये कोयता फिरवत असलेला व्हीडिओ इन्स्टाग्रामवर व्हायरल केल्या प्रकरणी शहर पोलिसांनी दोघां विरुध्द आर्म ऍक्ट अन्वये गुन्हा दाखल करत त्यांनी अटक केली आहे. तसेच त्यांची भाईगिरी थांबावी म्हणून पोलिसांनी त्यांच्या माफी मागतांनाचा व्हीडिओ काढला आहे. ज्यात दोन्ही तरुण माफी मागत असून असे व्हीडिओ काढू नका असे आवाहन इतरांना करत आहे. अलीकडे भाईगिरी ची क्रेझ दिसून येते.छपरी गाण्यांवर हत्यार घेऊन व्हिडीओ समाज माध्यमावर व्हायरल केला जातो.बुलढाणा येथील आरोपी अमित बेंडवाल आणि आदित्य ऊर्फ शक्ती संजय देशमुख दोघे रा.बुलडाणा यांनी हातामध्ये कोयता फिरवत असलेला व्हीडिओ इन्स्टाग्रामवर व्हायरल केला होता. त्यांना अटक करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तरुणांनी भाईगिरीचे व्हिडिओ बनवून सोशल मीडियावर व्हायरल करू नये, अन्यथा त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल असा, इशारा २ ऑगस्ट रोजी शहर ठाणेदार रवी राठोड यांनी दिला आहे.

# दारूच्या नशेत दुचाकीवरून पडल्याने एकाचा मृत्यू!

**जनसंचलन/बुलढाणा**

दारूच्या नशेत असताना दुचाकी वरून खाली पडल्याने एका ४० वर्षीय व्यक्ती गंभीर जखमी झाला होता.त्याला उपचारासाठी बुलढाणा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात आणले परंतु डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले आहे. प्रभाकर दांडगे वय ४० रा. जळकी बाजार ता. सिल्लोड शुक्रवारी दुपारच्या सुमारास गावातील बस स्टॅन्ड जवळ गाडीवरून खाली पडला.यात त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने बुलढाणा येथील जिल्हा रुग्णालयात आणले परंतु डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले आहे. घटनेच्या वेळी मृतक दारूच्या नशेत असल्याचे नातेवाईकांनी सांगितले आहे. याप्रकरणी बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद घेण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..

| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्री नंबर : १८००-३१३-२३२४



पत्रकारीतेचा धर्म आम्ही निभावणार

City बुलडाणा

सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल

वेब साईड & पोर्टल चॅनल

वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर

कुठली ही बातमी निशुल्क

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड

काही तक्रार असल्यास संपर्क

शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040 पिन 443001



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८